करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
www.saptahiksandesh.com
संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०




रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.३८ | पाने-१२ | दि.०४/०७/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.




# तालुक्यात तृणधान्याची सरासरीपेक्षा तिप्पट पेरणी

## पावसाने ओढ दिल्याने शेतकरी हवालदिल

करमाळा : तालुक्यामध्ये यावर्षी तृणधान्याची सरासरीच्या तिप्पट पेरणी झाली आहे. शेतातील पीकही जोमदार आहेत, पण पावसाने ओढ दिल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. तालुक्यामध्ये तृणधान्याची सरासरी १२६९४ हेक्टर आहे तर पेरणी ३०२२८ हेक्टर झाली आहे.

यावर्षी मे महिन्यामध्ये झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांनी खरीपाची मोठ्या प्रमाणात पेरणी केली आहे. तृणधान्या पाठोपाठ बाजरी, मका तसेच भुईमूग व सुर्यफूल याबरोबरच भाजीपाला आणि फडझाडांची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. तालुक्यामध्ये यावर्षी तृणधान्यात तूर १०९०८ हेक्टर तर सर्वात जास्त उडीद १९०८८ हेक्टर वर पेरण्यात आले आहे. मूग मात्र नगण्य म्हणजे २३२ हेक्टरवर पेरण्यात आला आहे. एकूण ३०२२८ हेक्टर मध्ये पेरणी करण्यात आलेली आहे. गळीत धान्यामध्ये भुईमूगाची अवघी ४५ हेक्टर, सूर्यफुल ४१ हेक्टर तर सोयाबीन २४ हेक्टरवर अशी एकूण ११० हेक्टर पेरणी झाली आहे. तालुक्यात गळीत धान्याची सरासरी २५९६ हेक्टर आहे. त्याची मात्र १० टक्के सुध्दा पेरणी झालेली नाही. याबरोबर बाजरी आणि मका यामध्ये बाजरी २२५ हेक्टर तर मका ८५३२ हेक्टरवर पेरण्यात आलेली आहे.

सध्या सर्व शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. तालुक्यात मे महिन्याची पावसाची सरासरी नोंद २५ मि.मी आहे. प्रत्यक्षात मात्र पाऊस २७१.८ मिलीमीटर म्हणजे सरासरीच्या १००८ टक्के पाऊस पडलेला आहे. तर जूनची सरासरी पावसाची नोंद ९९.२ मिलीमीटर आहे. प्रत्यक्षात मात्र ४३.८ मिलीमीटर पाऊस पडला, तो (पान २ वर..)



पावसाने ओढ दिल्यामुळे शेतकऱ्यांनी खरीपाच्या पिकाची अंतर मशागत करणे गरजेचे आहे. ज्यांच्याकडे पाणी आहे, अशा शेतकऱ्यांनी स्प्रिंकलर द्वारे पाणी दिल्यास पीकाला फायदा होऊ शकतो. महाडीबीटी योजना मार्चपासून होती, ती योजना गेल्या आठवड्यापासून सुरू झालेली आहे. त्याचाही लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा. तसेच पिक विम्याची मुदत ही ३० जुलैपर्यंत असल्याने शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत भाग घ्यावा.

...यु.एन.सानप (तालुका कृषी अधिकारी करमाळा)



जन्माला का आलो, हे समजणं हेच जन्माचे उद्दीष्ट आहे..!

## संपादकीय.......................................!

# वारकऱ्यांचा श्वास म्हणजे पंढरीची वारी..!

महाराष्ट्राचं आध्यात्मिक हृदय म्हणजे पंढरपूर आणि त्याचा श्वास म्हणजे 'वारी'. वारी हे केवळ धार्मिक यात्रा नाही तर ती एक जीवनपध्दती, समाजक्रांती आणि सांस्कृतिक परंपरेचा अखंड झरा आहे. दरवर्षी आषाढ शुध्द एकादशीला विठोबाच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपूरची वाट धरतात. टाळ मृदंगाच्या गजरात, अभंगाच्या गोडीने आणि नामस्मरणाच्या एकात्मतेने नटलेली ही यात्रा म्हणजे वारी. वारी हे एक चालतं श्रध्दास्थान आहे. अंत:करणाचा शुध्दीचा प्रवास करण्यासाठी वारी करायची असते.

वारी म्हणजे दर्शनाचा मार्ग नाही तर तो उदात्ततेचा मार्ग आहे. वारी आपल्याला अहंकारापासून नम्रतेकडे, स्वार्थापासून सेवाभावाकडे घेऊन जाते. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ महाराजांच्या विचारांना चालना देणारी वारी असते. वारी केवळ विठोबासाठी नसते ती स्वत:ला शोधण्यासाठी असते. वारीतून मिळतो तो संयमाचा धडा, सहिष्णुतेचा अनुभव, समतेचा संदेश, साधेपणाचं सौंदर्य. 'वारीत शरीर चालतं, पण मन उजळते' याचा अनुभव वारकऱ्यांना येतो. वारीमध्ये फक्त पायाने चालून जमत नाही तर मनानेही नम्र व्हाव लागतं. वारीच्या प्रवासात साधना आणि शिस्तीला खरे महत्व असते.

वारीमध्ये एकमेकांविषयी आदरभाव असतो. तिथे अहिंसा, शांती आणि समर्पण असते. वारीत गुरू-शिष्यांचे मिलन असते. सामुहिक सेवा असते. साधेपणाचं आचरण असते. वारीच्या दिंडीत कोण गरीब, कोण श्रीमंत याला अर्थ राहत नाही. सगळे एक होतात ते फक्त पांडुरंग या एकाच नावाखाली व एका छत्राखाली. हा एकात्मतेचा अनुभव देशात नव्हेतर जगात दुर्मिळ आहे. म्हणूनच वारी ही केवळ चालणं नाही तर ती मुल्यांची पाठशाळा आहे.

वारीत किर्तन, प्रवचन, भजनाबरोबरच 'राम कृष्ण हरी' चा अखंड गजर असतो. वारी मध्ये दिंडीची अनेकजण सेवा करतात. लागेल ती मदत, भोजन, पाणी, औषध वाटप, निवासाची सोय करतात. तर दिंडीतील वारकरी नामचिंतनाबरोबरच सामाजिक जागृती करतात. अनेक दिंड्या पर्यावरण, व्यसनमुक्ती, बालविवाह, स्त्रीशिक्षण अशा विषयांवर जनजागृती करतात. वारी ही 'मोठ्यांची दिंडी' आणि 'बालदिंडी' या दोन्हीतून भावी पिढीतही संस्कार रूजवते. वारीचा शेवटचा मुक्काम म्हणजे पंढरपूर. तिथे विठुरायाचे दर्शन होवो अथवा न होवो, तिथे चंद्रभागेचे स्नान, पांडूरंगाच्या राऊळाला प्रदक्षणा आणि कळसाचे दर्शन एवढेच उद्दीष्ट असते. वारी करायची कारण ती देवाशी जोडणारी नाही तर स्वत:शीही पुन्हा ओळख करून देणारी यात्रा आहे. संतांनी सांगितले आहे.., "देहातून देवाकडे.., अहंकारातून नामाकडे.., व्यसनातून विवेकाकडे !" हाच खरा वारीचा मार्ग.

वारी ही फक्त देवदर्शनाची प्रक्रिया नाहीतर ती आचरणदर्शनाची प्रक्रिया आहे. वारीने एका वर्षाचा सगळा थकवा, काळजी, दु:ख यांना विसरायला होते. वारीच्या वाटेवर एक पाऊल टाका तुम्हाला वाटेल तुम्ही देवाच्या नव्हे तर स्वत:च्या हृदयाच्या जवळ जात आहात. वारी म्हणजे संस्कृतीचं सजीव दर्शन. वारीत कोणतंही राजकारण नसतं. तिथे आवाज न करता घडवलेली समाजक्रांती असते. वारी म्हणजे माणसाला पुन्हा माणूस करणारा आणि जगण्याची दिशा देणारा मंत्र आहे. म्हणूनच म्हणतात..'वारी करा, स्वत:ला शुध्द करा, समाजात प्रकाश पेरा..!' वारी केवळ पंढरीची नाही तर ती महाराष्ट्राच्या मनाची वारी आहे. चालते पंढरपूर हे वर्णन केवळ शब्दांपुरते नाही तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात खोल रूजलेले मुळ आहे.

आयुष्य हे कशासाठी आहे, हे आपणाला समजत नाही. मुळातच जर हे आयुष्य का आणि कशासाठी जगायचं हे समजलं की जगण्याचं सार्थक होतं. आणि हे मात्र आम्हाला समजत नाही. आपण परवा पाहिलं की अहमदाबादला जे लोक एअर इंडियातून प्रवासाला निघाले होते, दोन मिनीटात २४२ पैकी २४१ लोक उध्वस्त झाले. त्यामध्ये अनेक उद्योगपती, कारखानदार, ऑफिसर, क्लास वन अधिकारी, राजकीय नेते होते. त्यातून कोणाचीही सुटका झाली नाही. शेवटच्या क्षणापर्यंत माणूस फक्त कष्ट आणि कष्ट करतो, मग आमचा जन्म कष्टासाठी आहे की आणखी कशासाठी आहे; याचे उत्तर जर समजून घ्यायचं असेलतर जीवनामध्ये वारी करणं गरजेचं आहे. ही वारी ज्याला अनुभवता आली, ज्याला या वारीतून काही समजून घेता आलं किंवा जे वारीतील वारकरी झाले त्यांना निश्चितच आपल्या जगण्याचा आणि आपल्या जीवनाचा अर्थ समजल्याशिवाय राहत नाही.

पान १ वरून पुढे...

# तालुक्यात तृणधान्याची सरासरीपेक्षा तिप्पट पेरणी

फक्त ४४.२ टक्के आहे. जून महिन्यात १० जूनला ५.९ मिलीमीटर , १२ जूनला ४ मिलीमीटर, १३ जूनला ६.३ मिलीमीटर, १४ जूनला ८.५ मिलीमीटर पाऊस झालेला आहे. या पावसानंतर पेरलेली पिके जोमदार आहेत, आता गरज आहे ती पावसाची.

पिक विमा ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्वाची बाब असून, यावर्षी शासनाने पीक विमा भरण्याची मुदत १ जुलै ते ३१ जुलै अशी ठेवलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिक विमा नोंदला पाहिजे. यामध्ये बाजारीसाठी हेक्टरी ७६ रुपये हप्ता असून त्याला मिळणारी संरक्षित रक्कम ३० हजार ५३८ रूपये आहे. मुगचा हप्ता हेक्टरी ७० रूपये असून त्याला मिळणारी संरक्षित रक्कम २८ हजार रूपये आहे. उडीदसाठी हेक्टरी ५०० रूपये हप्ता असून त्याला मिळणारी रक्कम २५ हजार रुपये आहे. मकासाठी हेक्टरी ५४० रूपये हप्ता असून त्याला मिळणारी संरक्षित रक्कम ३६ हजार रूपये आहे. कांदासाठी हेक्टरी ६८० रूपये हप्ता असून त्याला मिळणारी संरक्षित रक्कम ६८ हजार रूपये आहे. तूर साठी हेक्टरी ७४४ रूपये हप्ता असून त्याला मिळणारी संरक्षित रक्कम ३७ हजार २१८ रूपये आहे. असा पिक विम्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार असल्याने शेतकऱ्यांनी पीक विमा योजनांमध्ये भाग घ्यावा; असे आवाहन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड यांनी केले आहे.

# डॉक्टर्स असो; तर्फे वारकऱ्यांची मोफत तपासणी व औषधोपचार



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने वारकऱ्यांची मोफत तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. या कॅम्पचे आयोजन मौलालीमाळ, करमाळा येथे करण्यात आले होते. सर्व डॉक्टरांनी तीन-तीन तास ड्युटी करून चार दिवस आरोग्य सेवा दिली. १८०० वारकऱ्यांनी औषधोपचाराचा लाभ घेतला. करमाळा तालुका डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.उमेश जाधव, उपाध्यक्ष डॉ.मनोज काळे, डॉ.श्रीराम परदेशी, डॉ.बालाजी कटके यांनी नियोजन केले व करमाळा तालुक्यातील सर्व डॉक्टरांनी यामध्ये सहभाग घेतला.

# इ.१ ली मधील आरवचे राज्यस्तरीय परीक्षेत यश





करमाळा(सं.प्र.) : देलवडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये शिकत असलेला विद्यार्थी आरव अमोल कोल्हे याने पहिलीमध्ये विविध दहा प्रकारच्या प्रज्ञाशोध परीक्षे मध्ये उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. योग्य मार्गदर्शन, जिद्द व मेहनतीच्या जोरावर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीही अलौकीक असे यश प्राप्त करू शकतो; हेच आरवने मिळवलेल्या यशातून दिसून येते. लहानपणाचा मनसोक्त आनंद घेत हसत-खेळत शिक्षण हे फक्त जिल्हा परिषदेच्या शाळेतच मिळते. शिक्षणाच्या ओझ्याखाली बालपण न हरवता हसत-खेळत विविध स्पर्धा परीक्षांची तयारी त्याने केली. पहिली पासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतल्यामुळे सर्व स्पर्धा परीक्षेत त्याने उत्तुंग यश मिळवले आहे. आरव याने मंथन, जीटीएस व एक्सलंट ओलंपियाड परीक्षेत राज्यात तिसरा तसेच बीटीएस, अभिरूप, एटीएस परीक्षेत सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच लक्षवेध परीक्षेत १५० पैकी १३२ गुण, पंढरपूर टॅलेंट सर्च परीक्षेत १५० पैकी १३६ गुण मिळवले आहेत. बीडीएस मध्ये ९० गुण मिळवून सिल्वर मेडल प्राप्त केले आहे. अबॅकस नॅशनल लेवल मध्येही त्याने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. आरव यास शिक्षिका छाया लडकत, राजू भोंग यांचे मार्गदर्शन लाभले.

आरव याने जिल्हा परिषद शाळेत शिकून मिळवलेली गुणवत्ता इंग्रजी व इंटरनॅशनल शाळेसाठी आग्रही असणाऱ्या पालकांसाठी आदर्श घालून देणारी आहे. जिल्हा परिषद शाळेत सर्वकाही गोष्टी विनामुल्य असून मुलांचीही तितकीच काळजी घेतली जाते. त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी शिक्षक अगदी तळमळीने प्रयत्न करतात.

**...जयवंत नलवडे (गटशिक्षणाधिकारी)**


## लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स





होलसेल साडी डेपो व लेडीज, किड्स वेअर

प्रिंटेड साडी, कांजीवरम् साडी, काटपदर साडी, पार्टीवेअर साडी, कॉटन साडी, लेडीज टॉप व कुर्ती, लेगीज, किड्स वेअर तसेच

रेडीमेड ब्लाऊजच्या भरपूर व्हरायटीज मिळतील

टीप : आहेराच्या साड्या व इतर साड्या होलसेल दरात मिळतील.

विशेष ऑफर : कॉटन परकर फक्त १०० रू. मध्ये मिळेल

पैठणी साड्यांचा भरपूर स्टॉक उपलब्ध

पत्ता : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, भवानीपेठ, करमाळा.(९१७२०९२१८७)


सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...
जय बजरंगबली
टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

• काशी दर्शन यात्रा •
काशी, गया, अयोध्या, प्रयाग
दि.२५/७/२०२५ ते २/८/२०२५
सहल खर्च : १४,८००/-

• २ ज्योतिर्लिंग दर्शन यात्रा •
उज्जैन, ओंकारेश्वर, मंडलेश्वर, महेश्वर, इंदौर
दि.३/८/२०२५ ते ८/८/२०२५
सहल खर्च : ८,५००/-

• कन्याकुमारी •
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्
दि.११/८/२०२५ ते १८/८/२०२५
सहल खर्च : १०,०००/-

• तिरूपती बालाजी दर्शन •
तिरूपती बालाजी, गोविंदराज, पद्मावती माता
दि.१९/८/२०२५ ते २२/८/२०२५
सहल खर्च : ११०००/- विमान प्रवास

• चारधाम दर्शन यात्रा •
यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ
बद्रिनाथ, ऋषिकेश, हरिद्वार
दि.७/९/२०२५ ते २१/९/२०२५
सहल खर्च : ३५,०००/- रेल्वे प्रवास 3-AC

• चारधाम यात्रा •
गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ
बद्रीनाथ, हरिद्वार, ऋषीकेश
दि.७/१०/२०२५ ते १७/१०/२०२५
सहल खर्च : ३५,०००/- रेल्वे प्रवास 3-AC

• केरळ दर्शन •
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, कन्याकुमारी
त्रिवेंद्रम, मदुराई, मुन्नार, रामेश्वरम्
दि.२३/१०/२०२५ ते ४/११/२०२५
सहल खर्च : ३३,०००/- रेल्वे प्रवास 3-AC

द्वारकाधाम
गिरनार पर्वत, जुनागड, पोरबंदर
सोरटी सोमनाथ, नागेश्वर ज्योर्तिलिंग
दि.६/११/२०२५ ते १३/११/२०२५
सहल खर्च : ११,५००/-

• गंगासागर दर्शन •
गंगासागर, कलकत्ता, साक्षीगोपाल
कोणार्क, भुवनेश्वर, जगन्नाथपुरी धाम
दि.१६/११/२०२५ ते २४/११/२०२५
सहल खर्च : १२,८००/-

• नेपाळ दर्शन •
वाराणसी, गोरखपूर, पोखरा, लुंबिनी
मनोकामना, काठमांडू, अयोध्या, प्रयागराज
दि.५/१२/२०२५ ते १८/१२/२०२५
सहल खर्च : २७,५००/- रेल्वे प्रवास 3-AC

रेल्वे प्रवास, बस प्रवास, भोजन व्यवस्था, राहण्याची उत्तम सोय
संपर्क : 8888333638 I 8698333638 I 7218333638

श्वेता
गिफ्ट & टॉईज
लहान मुलांसाठी सर्व प्रकारची
खेळणी व भेटवस्तू
डिस्काउंट प्राईज मध्ये
उपलब्ध !
सर्व प्रकारच्या बॅटरी ऑपरेटेड
थार (जीप) व कार मिळतील.
टीप : बॅटरी ऑपरेटेड कार
विक्री व दुरूस्ती
चिमुकल्यांच्या
आनंदात भर पडेल असे
गिफ्ट वाढदिवसाला द्या..!
■ इलेक्ट्रीक कार
■ इलेक्ट्रीक बाईक
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.
मो.9822058106
Shweta
Gift & Toys

## मुख्याध्यापिका प्रफुल्लता सातपुते यांना २०२५ चा राजर्षी शाहू राष्ट्रीय सन्मान पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : देवळाली येथील वैद वस्ती जिल्हापरिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका प्रफुल्लता बाबासाहेब सातपुते यांना २०२५ चा राजर्षी शाहू राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानवतावादी सांस्कृतिक चळवळ व दिक्षा चॅरिटेबल ट्रस्ट यांचे वतीने कोल्हापूर येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सातपुते यांचे शैक्षणिक कार्य, गुणवत्ता वाढीसाठी राबविलेले विविध उपक्रम, वंचितांचे शिक्षण, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी केलेले प्रयत्न, पालक व विद्यार्थ्यां मधील अंधश्रध्दा दूर करण्यासाठी केलेले उपक्रम, वाचन चळवळ विकसित करण्यासाठी बुके ऐवजी बुकचा वापर तसेच विधवा महिलांना समाजात सन्मान मिळवून देण्यासाठी संक्रातीला विधवा महिलांना हळदी कुंकवाचा मान या सर्व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. फेटा, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, राजर्षी शाहू महाराजांची प्रतिमा आणि पुस्तक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सातपुते यांना मानाचा पुरस्कार मिळाल्या-बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाच्या वतीने
## वारकऱ्यांना मोफत औषधांचे वाटप - डॉक्टरांकडून रूग्णांची तपासणी

करमाळा(सं.प्र.) : पंढरपूरकडे मार्गस्थ होणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधी वाटपाचा सलग तीन दिवस कार्यक्रम देवळाली येथे शिवसेना तालुका समन्वयक राहुल कानगुडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आला आहे. या शिबीराचे उद्घाटन जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांचे हस्ते झाले. यावेळी मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी रूग्णांची सेवा केली. प्रत्येक वारकऱ्यांना लागेलत औषधे मोफत देण्यात आले. ज्या वारकऱ्यांना इंजेक्शन, सलाईनची गरज असेल, अशांना मोफत इंजेक्शन देण्याची सोय स्वातंत्र्यसैनिक साथी मनोहरपंत चिवटे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये करण्यात आली आहे. डॉ.ओंकार उघडे यांनी वारकऱ्यांची आरोग्य सेवा मोफत केली.

करमाळा शहरात प्रथम सुरू..!
Reg no.42433
डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील
( Clinical Cosmetologist & Trichologist )
पाटील स्किन, हेअर ॲन्ड जनरल क्लिनिक
उपलब्ध सुविधा
• त्वचा : P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोक्नीडलिंग, अँटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, वांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
• केस : P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे
• सर्व आजारांवर उपचार • रक्त लघवी तपासणी • लहान मुलांना वाफ देणे
• सांधेदुखी, कंबरदुखी • होमिओपॅथिक उपचार
पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573

प्रियंका
आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट
व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

अभिजीत कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट
• पत्ता •
शिवाजीनगर, करमाळा.
प्राचार्य बिभिषण गुंड
मो.9975681947
◀ MS-CIT
◀ TALLY
◀ DTP
कोर्ससाठी प्रवेश चालू आहे..!



डॉ.साळुंके
स्कीन केअर क्लिनीक
त्वचा रोग
निदान व उपचार
डॉ.रोहीत दिगंबरराव साळुंके
B.A.M.S., D.Derma(Ay)(Pune)
त्वचा व केशविकार तज्ञ
त्वचा विकार : नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, सोयरायसिस, काळे डाग, पिंपल्स, चाई, कोड, स्ट्रेच मार्क, केस गळती, केसातील कोंडा, जुनाट खाज, ॲलजी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या, नखाचे आजार, सुरमा
वेळ
सकाळी १० ते दुपारी २ व सायं.४ ते ८ पर्यंत (रविवारी सुट्टी राहील.)
पत्ता : कमलादेवी रोड, करमाळा. (9404692188, 7387376531)



## अल्ट्रटेक सिमेंटची विक्रमी विक्री केल्याबद्दल
# अमोल ढवळे यांचा प्रथम क्रमांकाचे ५ ग्रॅम सोन्याचे बक्षीस देवून सन्मान




करमाळा(सं.प्र.) : बायपास रोड, करमाळा येथील शिवम् बिल्डींग मटेरियल सप्लायर्सचे मालक अमोल ढवळे यांनी यावर्षी अल्ट्रटेक सिमेंटची विक्रमी विक्री केली, त्यामध्ये त्यांचा तालुक्यात प्रथम क्रमांक आला आहे. प्रथम क्रमांकाचे ५ ग्रॅम सोनेचे बक्षीस देवून त्यांना कंपनी तर्फे सन्मानित करण्यात आले. बक्षीस वितरणाचा कार्यक्रम नुकताच बार्शी येथे संपन्न झाला. सर्वोत्तम विक्रेता म्हणून त्यांची निवड झाली आहे. गेल्या वर्षीही श्री.ढवळे यांनी हा पुरस्कार पटकाविला होता. त्यावेळीही त्यांना बुलेट मोटारसायकल बक्षीस म्हणून मिळाली होती. सलग दुसऱ्या वर्षी ढवळे यांनी प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळवले आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# लिटिल चॅम्प प्री स्कुल मध्ये डॉक्टर डे साजरा



करमाळा(सं.प्र.): शहरात नव्याने सुरू झालेल्या लिटिल चॅम्प प्री स्कुल मध्ये जागतिक डॉक्टर्स डे उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अंकिता बिनवडे, डॉ.मंजिरी नेटके, डॉ.नेहा मेहेर, डॉ.प्रिती शेटे, अपर्णा चिवटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित डॉक्टरांनी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले. डॉ.शेटे मॅडम यांनी विद्यार्थी आहाराबद्दल त्यांना समजेल अशा बालभाषेचा वापर करून मार्गदर्शन केले. डॉ.बिनवडे यांनी मोबाईलचा विद्यार्थ्यांवर होणारा विपरीत परिणाम याबद्दल मार्गदर्शन केले. पाहुण्यांचे स्वागत व सत्कार एलिझाबेथ आसादे व अपर्णा चिवटे यांनी केले. सुत्रसंचालन मंजुश्री मुसळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किर्ती राठोड, किर्ती पाचकवडे, जाई हवलदार यांनी परिश्रम घेतले.

विश्वास तुमचा.., मार्गदर्शन आमचे.., यश तुमचे..!
करमाळा शहरातील एकमेव शासनमान्य संस्था
अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट
संस्था कोड : 23064 (संगणक अभ्यासक्रम कोड : 230640211830)
कॉम्प्युटर टायपिंग
■ इंग्रजी : ३०, ४० श.प्र.मि.
■ मराठी : ३०, ४० श.प्र.मि.
■ हिंदी : ३०, ४० श.प्र.मि.
प्रवेश प्रक्रिया सुरू आहे
वैशिष्ट्ये...
सर्व शासकीय स्कीम लागू
• महिला व मुलींसाठी स्वतंत्र बॅच
• महिला व मुलींसाठी महिला शिक्षिका
• मोफत इंटरनेट व वाय-फाय सुविधा उपलब्ध
• सुसज्ज कॉम्प्युटर लॅब व ऑनलाईन टायपिंग सराव
• अनुभवी शिक्षक वृंद
• १००% यशाची खात्री
ब्राह्मण, राजपुरोहित राजपुत, मारवाडी, गुजराथी इ. जाती मधील युवक-युवतींना कोर्स 100% फ्री
टीप : बाहेरगावच्या विद्यार्थ्यांना एस.टी.पासची सोय
पत्ता : जुन्या कोर्टासमोर, किल्ला विभाग, करमाळा.
संपर्क : अलोक आवाड (8087905085, 9975606162)

डॉ.ओंकार विलास शिराळ (B.D.S.) यांचा
अनुजा दातांचा दवाखाना
वेळ : सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत (सोमवार ते शनिवार)
उपलब्ध सुविधा
• स्टेट ऑफ द आर्ट डेंटल चेअर
• पोर्टेबल एक्स-रे
• वेडेवाकडे/पुढे आलेल्या दातांचे ट्रीटमेंट
• लहान मुलांच्या दातांचे ट्रीटमेंट
• दातांच्या रंगाचे/पांढरे सिमेंट भरणे
• वेदनारहीत इंजेक्शन प्रणाली
• दात काढणे
• शस्त्रक्रिया करून अक्कलदाढ काढणे
• इंट्राओरल स्कॅनरद्वारे दातांचे माप घेणे
• दातांच्या आधारे पक्के दात बसवणे
• डेंटल इम्पलांटच्या सहाय्याने दात बसवणे
• पूर्ण/आंशिक कवळी कमीत कमी अपॉइंटमेंटमध्ये बसवणे
• जबड्याच्या आजारांचे निदान
• रूट कॅनल ट्रीटमेंट
• अल्ट्रासोनिक मशीनद्वारे इन्फेक्टेड टिश्यू डिब्रायडमेंट करणे
• पुढील दातांमधील गॅप बंद करणे
• दात पांढरे/शुभ्र करणे
• इंट्राओरल कॅमेराद्वारे तपासणी
• अल्ट्रासोनिक मशीनद्वारे दात स्वच्छ करणे
• मुख कर्करोग निदान
• तंबाखू/गुटखा सवयी सोडवण्याबद्दल कौन्सलिंग





कृष्णाजीनगर, कमलादेवी रोड, LIC ऑफिस शेजारी, बायपास चौक, करमाळा.

MFS महावीर फरसाण & स्वीट्स
दर रविवारी तुपातील जिलेबी आणि दाबेली मिळेल.
● मलाई बर्फी, काजूकतली, तुपातील बालुशाही मलाई पेढा, कश्मिरी कलाकंद, फरसाण, ढोकळा
● पुण्यातील सुप्रसिध्द बेक मंचचे खारी, टोस्ट, बटर, क्रीमरोल
● नसले बंधू शेंगाचटणी मिळेल.
प्रोप्रा : कौशिक वासाणी (9423376663)
पत्ता : बस स्टॅन्ड शेजारी, पंजाब वस्ताद चौक, मेनरोड, करमाळा.

खुशखबर दर सोमवारी मुळव्याध इंजेक्शन (Scelro - Theropy) खुशखबर
फक्त 10,000/- मध्ये पहिल्या पाच पेशंटसाठी मर्यादित !
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवारी उपलब्ध
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
मो.9763035862
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
ओपीडीचे वैशिष्ट्ये...
● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा
● प्रभावी औषधी सुविधा
● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
● आठवड्यातून दोनदा ओपीडी ● पार्किंगची व्यवस्था
सुचना १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# कृषी विभागाच्या वतीने चिखलठाण येथील प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान

करमाळा(सं.प्र.): कृषी दिनानिमित्त कृषी विभागाच्या वतीने सोलापूर येथे चिखलठाण येथील अविनाश सरडे व संतोष चव्हाण या दोन प्रगतशील शेतकऱ्यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन विभाग सोलापूर व जिल्हा परिषद कृषी विभाग यांचे वतीने कृषी दिनानिमित्त कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सन्मान जिल्हा परिषद सभागृहात करण्यात आला. यामध्ये चिखलठाण नं.२ येथील अविनाश सरडे यांनी निर्यातक्षम केली पिकामध्ये घेतलेल्या भरघोस उत्पादनाबद्दल व संतोष चव्हाण यांना सेंद्रिय शेतीमधील उल्लेखनीय



कार्याबद्दल प्रशस्तीपत्रक व पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सरडे व चव्हाण यांच्या या सन्मानाबद्दल करमाळा तालुक्यातून त्यांचे विशेष अभिनंदन केले जात आहे.

# कमलादेवी मंदिर जतन व संवर्धनाच्या कामासाठी १७ हजार ६३२ रूपयाची देणगी



करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील श्री कमलादेवी मंदिराच्या जतन व संवर्धनाच्या कामासाठी १७ हजार ६३२ रूपयाची देणगी मंदिर समितीकडे प्राप्त झाली आहे. यामध्ये महात्मा गांधी विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक शशिकांत जाधव यांचेकडून ११ हजार रूपयाची देणगी प्राप्त झाली आहे. तसेच कै.पंडित मनोहर होसिंग व कै.विजया पंडित होसिंग यांचे स्मरणार्थ बाळासाहेब होसिंग (रा.श्रीदेवीचामाळ) यांचेकडून ५०१६ रूपयाची देणगी मिळाली असून सुरेखा मोहनराव कुलकर्णी (रा.धाराशिव) यांचेकडून ऑनलाईन १६१६ रूपयाची देणगी मिळाली आहे. या सर्व देणगीदारांचे आभार श्री जगदंबा कमलादेवी देवस्थान ट्रस्टकडून मानण्यात आले आहे. मंदिर जतन सर्वधनाचे काम सध्या प्रगतीपथावर असून भाविकांनी सदर कामास सढळ हाताने देणगी देऊन सहकार्य करावे; असे आवाहन व्यवस्थापक अशोक गाठे यांनी केले आहे.

# आमसभेतील प्रश्नांची लेखी उत्तरे नागरीकांना द्यावीत : संजय घोलप



करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुक्यातील २०२४-२५ ची आमसभा ३० जून रोजी झालेली. त्यामध्ये विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तरे नागरीकांना द्यावीत; अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष संजयबापू घोलप यांनी लेखी निवेदनाव्दारे आमसभा सचिव गटविकास अधिकारी यांचेकडे केली आहे. याबाबत घोलप यांनी निवेदनात म्हटले आहे, की आमसभेत वेळेअभावी बरेचसे प्रश्न उपस्थित झाले नाही. त्यांना विचारण्याची संधी मिळाली नाही. एक तर दहा वर्षांनी आमसभा होती. त्यामुळेच बरेच प्रश्न आले होते. तरी त्या नागरीकांची निराश झालीव आमचे प्रश्न अनुत्तरीत राहीले. तरी आमसभेचे सचिव यांनी आलेल्या प्रत्येक प्रश्नांचे लेखी उत्तर नागरीकांना द्यावेत. एक महिना होऊन पण नागरीकांना लेखी उत्तरे मिळाली नाहीत. ते आतुरतेने वाट पाहत आहेत. लवकरात लवकर उत्तरे मिळावीत अन्यथा आम्हाला कायदेशीर मार्गाने आंदोलन करावे लागेल; असाही इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष संजय घोलप यांनी दिला आहे.

# मुस्लिम बांधवांनी पाल्याच्या दाखल्यावर कुणबीचा उल्लेख करावा

## सकल मुस्लिम समाज व डॉ.एपीजे अब्दुल कलाम फाउंडेशनचे आवाहन



करमाळा(सं.प्र.) : नुकतेच मराठा सेवा संघाच्या वतीने दाखल्यावर कुणबी लावावे; अशा प्रकारचे निवेदन गटशिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकारी नगरपालिका यांना देण्यात आले आहे. यालाच अनुसरून सकल मुस्लिम समाजाच्या वतीने सर्व मुस्लिम बांधवांना आवाहन करण्यात येत आहे, की ज्या मुस्लिम बांधवाचे कुणबीचे दाखले व कुणबीच्या नोंदी आहेत, अशा पालकांनी तात्काळ मराठा सेवा संघाने केलेल्या आव्हानाला साथ देत, आपण आपल्या पाल्याचा कुणबी असा उल्लेख दाखल्यावरती करून घ्यावा. अशा प्रकारची सूचना सकल मुस्लिम समाज व डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. कुणबीची नोंद जर दाखल्यावर लागली तर त्या विद्यार्थ्यांचे पिढ्यान पिढ्या फायदा होणार आहे. तसेच शैक्षणिकदृष्ट्या सवलती मिळणार आहेत. त्यामुळे सर्वांनी जागरूक होऊन याचा फायदा घ्यावा; असे आवाहन सकल मुस्लिम समाजाचे अध्यक्ष जमीर सय्यद यांनी केले आहे.

श्री गजानन अगरबत्ती
● सुगंधी अगरबत्ती ● कापूर
● अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
● विविध कलरची रांगोळी
● सर्व प्रकारचे लोबन,
● सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा (प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, 8007255456)

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना
श्रीजय नेत्र रुग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे
M.S. Netra (Ayu) (Gold Medalist)
(नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
Reg no.1-77199-A
● मोतीबिंदू(Catract) आधुनिक मशिनद्वारे शस्त्रक्रिया
● डोळ्यांवरील पडदा, तिरळेपणा, लासूर शस्त्रक्रिया उपलब्ध
● Nd YAG लेसर सुविधा उपलब्ध
इमर्जन्सी सेवा उपलब्ध
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते रात्री ९ (रविवार - सकाळी १० ते दु.२ पर्यंत)
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३
रिसेप्शनीस्ट नेमणे आहे. गरजूंनी त्वरीत संपर्क साधावा !

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स ● प्लंबींग ● हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

आशिर्वाद



स्व.डॉ.रतनलाल माणिकचंद शहा-जवळेकर

# शहा हॉस्पिटल (जवळेकर)

हॉस्पिटल संपर्क :फोन : (०२१८२) ३५०८०३




## प्रथम वर्धापन दिन

दि.१ जुलै रोजी नवीन स्थलांतरीत झालेल्या जागेतील **'जवळेकर हॉस्पिटल'** ला १ वर्षे पूर्ण होत आहे. ग्राहकांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल प्रथम वर्धापन दिनानिमित्त

## हार्दिक शुभेच्छा..!

**डॉ.राजेश आर. शहा**
एम.बी.बी.एस., डी.सी.एच.(बालरोग तज्ञ)

**डॉ.संदेश आर. शहा**
एम.एस.(जनरल सर्जन)

**डॉ.पियुष एस. शहा**
एम.एस.(जनरल सर्जन)

**डॉ.प्रतिक आर. शहा**
एम.डी.(मेडिसीन)

**उपलब्ध सुविधा**

- ई.सी.जी.
- सर्जिकल होम
- फिजीओथेरपी
- अतिदक्षता विभाग
- सी-आर्म
- गॅस्ट्रोस्कोपी
- कलर डॉपलर
- डी.आर. डिजीटल एक्स-रे
- सुसज्ज ऑपरेशन थिएट
- हायस्पीड स्पायरल सिटीस्कॅन इन कॅम्पस्
- अल्ट्रा सोनोग्राफी
- कॉम्प्युटराईज्ड लॅबोरेटरी
- सरकारमान्य कुटूंब नियोजन व गर्भपात केंद्र

सौजन्य

## स्वस्तिक मेडिकल & जनरल स्टोअर्स

**शहा हॉस्पिटल समोर, मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर**

प्रोप्रा : अतिश(दादा) रविंद्रकुमार दोशी (मो.9850287008)

**स्वस्तिक मेडिकल फॅमिली आणि सर्व स्टाफ**

करमाळा तालुका व ग्रामीण भागात
'एअरटेल' मध्ये नोकरीची सुवर्णसंधी..!
'एअरटेल' कंपनीमध्ये सिम कार्ड विक्रीसाठी
गरजू मुले/मुली पाहिजेत !
फिक्स पगार : 7000 ते 25000
इन्सेंटिव्ह + पीएफ + मेडिक्लेम
- मुलांसाठी टू व्हीलर, हेल्मेट, स्मार्टफोन आवश्यक
- मुलींसाठी स्मार्टफोन आवश्यक
- मार्केटींग करणाऱ्या महिला व गरजू मुलांना प्राधान्य दिले जाईल.

संपर्क
फ्रेंड्स मोबाईल शॉपी & इलेक्ट्रॉनिक्स
5G airtel
करमाळा, जेऊर, केम आणि करमाळा पूर्ण तालुका अधिकृत डिलर (डिस्ट्रीब्युटर) : प्रफुल प्रदीप शिंदे
- मोबाईल खरेदीवर भेटवस्तू
- सर्व प्रकारचे फायनान्स उपलब्ध
- ० डाऊन पेमेंटवर मोबाईल मिळेल
- एक्सचेंज : जुना द्या, नवीन घ्या !

हरवलेले सिमकार्ड व बंद पडलेले सिमकार्ड चालू करून मिळतील..!
ओरिजनल airtel एक्सट्रिम एअरफायबर सुपर फास्ट इंटरनेट उपलब्ध आहे
आमच्याकडे सर्व नामांकित कंपन्यांचे नवीन मोबाईल व स्मार्ट एलईडी टीव्ही होलसेल दरात मिळतील.
संपर्क : एअरटेल ऑफिस, किल्लावेस, करमाळा. (मो.9823162510, 9326969696)

श्री गणेश A/C फंक्शन हॉल
- नामकरण सोहळा
- वाढदिवस
- मुंज
- साखरपुडा
- गेट टूगेदर
- डोहाळे जेवण
- कंपनी मिटींग

इतर कोणत्याही शुभ कार्यक्रमासाठी
सर्व सुविधायुक्त A/C हॉल उपलब्ध
श्री गणेश फॅमिली रेस्टॉरंट
Pure Vage
स्वादीष्ट व रूचकर
शुध्द शाकाहारी जेवणाचे एकमेव ठिकाण !
पंजाबी डिशेस
चायनीज
महाराष्ट्रीयन
तंदूर
प्रोप्रा : ममदापूरे बंधू
(9922264931, 9730961492)
पत्ता: महावीर उद्यान शेजारी, जेऊर रोड, करमाळा.

ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरलेले...
न्यू संगम स्वीट्स
आषाढीवारीनिमित्त सर्व भाविकांना हार्दिक शुभेच्छा !
उपवासाचे पदार्थ...
- फराळी चकली
- बटाटा चिली-मिली
- राजगिरा मठरी
- बटाटा चिवडा
- काजू कतली
- राजगीरा खाकरा
- बटाटा वेफर्स
- अंजीर मलई बर्फी
- राजगिरा चिक्की
- केळी वेफर्स
- गुलकंद मलई बफी
- शाबुदाणा खाकरा
- शाबू चिवडा
- शेंगदाणे चिक्की

बालाजी, हलदीराम, बुधाणी, लक्ष्मीनारायण, चितळे प्रॉडक्ट इ. सर्व नामांकित कंपनीचे
वेफर्स, चिवडा, खजुर मिळण्याचे एकमेव ठिकाण !
जलाराम, पार्श्वनाथ, चंदे, चकोते, राजवीर बेकरी प्रॉडक्ट मिळतील
पंजाब वस्ताद चौक, करमाळा. प्रोप्रा : एस.पी.चुंग (९८६०६७०८१६)

॥ पाचवे पुण्यस्मरण ॥



स्व.आनंद रामलिंग देशमुखे
(मृत्यू दि.१०/७/२०२०)

जो आवडे सर्वांना, तोचि आवडे देवाला
नियतीचा हा खेळ निराळा, न कळला कधी कुणाला
दृष्ट लागली सुखाला, अवेळी नेले तुम्हाला
या नयनातून आश्रु सरती, दिवस न सरतो स्मृती विना

पाचव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त तुझ्या स्मृतीस
भावपूर्ण आदरांजली !

शोकाकुल
रामलिंग(आण्णा) शिवमुर्ती देशमुखे (वडील/माजी सरपंच)
सौ.आशा रामलिंग देशमुखे (आई/माजी सरपंच)
अश्विनी आनंद देशमुखे (पत्नी/पीएसआय), आर्यन आनंद देशमुखे (मुलगा)
सौ.निशा सागर निळकंठ (बहिण), सौ.रेखा अमर गवसणे (बहिण)
देशमुखे व मित्र परिवार तसेच समस्त ग्रामस्थ, घारगाव

## महेश डोंगरे-पाटील यांचा उपक्रम

# पायी जाणाऱ्या वारकऱ्यांना दीड लाख मोफत चिवडा पॅकेटचे वाटप



करमाळा(सं.प्र.) : मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक महेश डोंगरे-पाटील यांचे वतीने आषाढी वारीनिमित्त पंढरपूरला पायी जाणाऱ्या वारकऱ्यांना १ जुलै रोजी सकाळी सात वाजल्यापासून ते दिवसभर दीड लाख मोफत चिवडा पॅकेटचे वाटप करण्यात आले. करमाळा-टेंभूर्णी हायवेवरती सांगवी फाटा येथे पंढरपूरकडे पायी चालत जाणाऱ्या वारकऱ्यांना गेल्या २३ वर्षापासून हा उपक्रम महेश डोंगरे-पाटील यांच्या माध्यमातून अवितरपणे सुरू आहे. यावेळी पोलीस निरीक्षक रणजित माने, जगद्गुरू महामंडलेश्वर महंत डॉ.रामकृष्णदास महाराज लहवितकर, रामभाऊ महाराज निंबाळकर, अनिरूध्द महाराज निंबाळकर, गणपत बसळे, भागवत डुबल, ओमकार डुबल, ऋषिकेश डुबल, अक्षय बसळे, ज्योतीराम धुमाळ, संतोष घोंगडे, बाळासाहेब हजारे, रंगनाथ शिंदे, नाना लोकरे, सुहास कदम, कृष्णा धुमाळ, अमोल पवार, हनुमंत शिंदे, हनुमंत अवघडे, बाळासाहेब निकम, बापूसाहेब जगदाळे, दादासाहेब डोंगरे, नाथा सुतार, भैरवनाथ बेंद्रे, गोपाळ लोणकर, बिरूदेव धडस आदीजण उपस्थित होते.

आता करमाळा शहरात
कान, नाक, घसा तज्ञ
डॉ.हर्षद मगर (ENT Specialist) MBBS.MD pune
यांचे नाक, कान व घसा विषयीचे
मोफत आरोग्य शिबीर
शिबीराची वैशिष्ट्ये : बहिरेपणाची पडताळणी, घशाच्या कॅन्सरची तपासणी घसा व नाकाच्या आजाराचे निधान, ॲलर्जीचे निदान, चक्कर येणे याचे निदान
दि.४ जुलै रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत.
स्थळ : शिंदे हॉस्पिटल, बायपास रोड, करमाळा येथे होणार आहे.
टीप : दर शुक्रवारी दुपारी ३ ते सायं. ४ पर्यंत कान, नाक, घसा तज्ञ डॉ.हर्षद मगर शिंदे हॉस्पिटल, करमाळा येथे उपलब्ध
उपलब्ध सुविधा व उपचार : कानाचा पडदा फाटणे, आवाजात बदलाव येणे, ॲलर्जी, श्वास नलिकेची समस्या, सायनसचे आजार, बहिरेपणा, झोपेत घोरणे, टॉन्सिलचे आजार, थायरॉईडची समस्या, दुर्बिणद्वारे नाक व घसा तपासणी, लासुर्णीची समस्या, चक्कर येणे, घशाचे व तोंडाचे कॅन्सर करमाळा शहर व तालुक्यातील गरजू रूग्णांनी अवश्य लाभ घ्यावा..!

# जाधव-पाटील हॉस्पिटलमध्ये मुळव्याध संबंधी शिबीराची यशस्वी सांगता



करमाळा(सं.प्र.) : आई कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून करमाळा शहरातील जाधव-पाटील हॉस्पिटल मध्ये २९ जूनला मुळव्याध संबंधीच्या आजाराविषयी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीराचे आयोजन मुळव्याध तज्ञ डॉ.प्रदीप तुपेरे व त्यांचे समवेत असलेले नामांकित डॉक्टर व त्यांची टीम यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. शिबीरात ९५ रूग्णांनी सहभाग नोंदवला. मुळव्याध संबंधीच्या आजाराविषयी विविध तपासण्या करून काही ऑपरेटीव्ह असणाऱ्या नागरीकांचे ऑपरेशन करण्यात आले. या सर्व सुविधा नाममात्र दरामध्ये देण्यात आल्या. यावेळी जाधव-पाटील हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ.रोहन पाटील यांनी इथून पुढेही करमाळा तालुक्यातील नागरीकांसाठी अशा प्रकारच्या वेगवेगळ्या रोगासंबंधीच्या शिबीरांचे आयोजन करण्याचा मानस व्यक्त केला. तसेच संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य बाबत सेवा देण्याचे कार्य केले जाईल. याचा लाभ सर्वसामान्य नागरीकांना होईल; असेही डॉ.पाटील यांनी सांगितले.

शिवरत्न ॲग्रो सर्व्हिसेस

प्रोप्रा : अमरजित साळुंके (मो.९८२३३७१४५७)
फिनोलेक्स ड्रिप, पीव्हीसी पाईप, एचडीपीई पाईप, स्प्रे पाईप, मोटर., सर्व प्रकारची खते, कीटकनाशक, तणनाशक, बी-बियाणे., एचटीपी स्प्रे पंप, बॅटरी पंप तसेच शेती उपयोगी सर्व साहित्याचे अधिकृत विक्रेते
• नवीन पत्ता •
बायपास चौक, उड्डाण पुलाजवळ, कमलादेवी रोड, करमाळा.


धर्मवीर वैद्यकिय मदत सामाजिक संस्था ठाणे संचलित
College Code : 1384
श्रीमती गंगुबाई संभाजी शिंदे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (कॉलेज), करमाळा.
ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी 'नर्सिंग' क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी !
G.N.M. डिप्लोमा कोर्स प्रवेश देणे सुरू
• कालावधी : ३ वर्षे
• शैक्षणिक पात्रता...
१२ वी पास (सायन्स/कॉमर्स/आर्टस्)
मान्यताप्राप्त..
• महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
• महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक मंडळ, मुंबई
• महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई
■ १००% नोकरीची हमी
■ सर्व शासकीय शिष्यवृत्तींचा लाभ
■ फक्त मुलींसाठी मोफत प्रवेश..
■ जॉब प्लेसमेंट
■ हॉस्टेल सुविधा
■ हॉस्पीटल व्हिजीट्स व प्रशिक्षण
■ इंग्लिश स्पीकींग क्लासेस

सुविधा...
• राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, शासकीय, निमशासकीय परदेशात, नगरपालिका, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय, खाजगी रूग्णालय, जिल्हा परिषद रूग्णालयामध्ये १००% नोकरीची सुवर्णसंधी !
• मुलींकरीता सर्व सोयीनीयुक्त होस्टेल व मेसची सुविधा.
• प्रात्यक्षिक व क्षेत्रीय अनुभवासाठी सुपर मल्टी-स्पेशालिटी रूग्णालय, मनोरूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालये.
• सुसज्ज लॅब, इमारत, भव्य ग्रंथालय, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब.
• अनुभवी प्राध्यापक वर्ग, नामांकित हॉस्पीटलशी संलग्न नोकरीची हमी.
• एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांना (शासकीय नियमानूसार) १००% शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध.
पत्ता : अमरनाथ टॉवर, तिसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. फोन : (०२१८२)२९९५४७, ९५४५६२०९९९

२४ तास आपल्या सेवेत
मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे चॅरिटेबल हॉस्पिटल, करमाळा.
डॉ.ओंकार अभिमन्यु उघडे-पाटील M.B.B.S. (Gen.Physician) यांचे तज्ञ मार्गदर्शन व तपासणी
सुविधा : ॲडमीट, ऑपरेशन व सर्व रोगनिदान
मेंदू-मणका व गुडघे/संधिवात, त्वचारोग, स्त्रीरोग तज्ञ
टीप : दर आठवड्याला तज्ञ डॉक्टरांची व्हीजीट सेवा
तपासणी फी फक्त Rs.100/-
पत्ता : अमरनाथ टॉवर, दुसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. मो.८४४६१३९५९३

# विद्युत पंपाला कनेक्शन देण्यासाठी दहा हजार रूपयाची लाच

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची सहाय्यक अभियंत्यावर कारवाई

करमाळा(सं.प्र.) : शेत जमिनीत शेतीपंपाचे पोल उभारून विद्युत पंपाला कनेक्शन देण्यासाठी दहा हजार रूपयाची लाच मागितलेल्या सहाय्यक अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे. दिग्विजय बाबासाहेब जाधव (सहाय्यक अभियंता, शाखा जेऊर) असे त्या अभियंत्याचे नाव आहे. विद्युत कनेक्शन मिळण्याकरीता महावितरण कार्यालय जेऊर येथे अर्ज, प्रतिज्ञापत्र सादर केले होते. त्याचा पाठपुरावा हे तक्रारदार करत होते. तक्रारदार यांचे आईच्या नावे असलेली शेती जमीन मध्ये शेतीपंपाचे विद्युत कनेक्शन महावितरण कार्यालय यांचेकडून विद्युत पोलची उभारणी करून वीज कनेक्शन देण्याकरीता सहाय्यक अभियंता दिग्विजय जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे दहा हजार रूपयाची लाच मागितली. लाच रक्कम स्वीकारण्याची संमती दिल्या वरून लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलीसांकडून दिवसा घरफोडी झालेल्या प्रकरणाचा छडा

करमाळा(सं.प्र.) : करमाळा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने दिवसा घरफोडी झालेल्या प्रकरणाचा छडा लावत १ लाख ५० हजार रूपये किंमतीचे सोन्याचे दागिणे हस्तगत केले. या प्रकरणी बीड जिल्ह्यातील पांडेगव्हाण येथील एका सराईत आरोपीस अटक करण्यात आली आहे. ६ डिसेंबर २०२४ रोजी अभिजीत जीवन सरडे (वय-२७, रा.कंदर) यांनी करमाळा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. दुपारी १२ ते २.३० दरम्यान अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा उचकटून आत प्रवेश केला व सोन्याचे दागिणे व रोख रक्कम चोरून नेली. यावरून अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला होता.

तपासा दरम्यान रामेश्वर जंगल्या भोसले (वय-२५, रा.पांडेगव्हाण, ता.आष्टी, जि.बीड) यांच्याकडे संशयाची सुई वळली. पोलीसांनी त्यास ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले असता, पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली. कोठडीत चौकशी दरम्यान त्याच्याकडून १.५ लाख रूपये किंमतीची सोन्याची कर्णफुले व ठुशी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. रामेश्वर भोसले हा पूर्वीही अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये गुंतलेला असून त्याच्यावर करमाळा, कर्जत, गंगापूर, बिडकीन, राहुरी व आष्टी पोलीस ठाण्यामध्ये एकूण आठ गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यामध्ये चोरी, जबरी चोरी, घरफोडी, डकैतीच्या तयारीसह विविध गंभीर कलमांचा समावेश आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी (सोलापूर ग्रामीण), अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील (करमाळा उपविभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक रणजित माने, सहाय्यक पोलीस निरीक्षक गीरिजा म्हस्के, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मदने, पोलीस हवालदार अजित उबाळे, पोलीस नाईक वैभव टेंगल, मनिष पवार, पोलीस शिपाई सोमनाथ गावडे, योगेश येवले, मिलींद दहिहांडे, अर्जुन गोसावी, अमोल रंदिल, रविराज गटकुळ यांचेसह अंगुलीमुद्रा व सायबर विभागातील अधिकारी व अंमलदारांचा मोलाचा सहभाग होता.

# उमरड-केडगाव भुयारी मार्गाचे काम सुरू : वाहतूक सुलभ होऊन वेळेची बचत होणार

करमाळा(सं.प्र.) : उमरड ते केडगाव रेल्वे लाईनखाली भुयारी मार्ग व्हावा, अशी मागणी अनेक वर्षापासून नागरीकांची होती. अखेर ही मागणी मार्गी लागली आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर कुगाव, चिखलठाण, दहिगाव, शेटफळ, केडगाव या परिसरातील नागरीकांना करमाळा, राशिन, भिगवणकडे जाण्यासाठी मोठा फायदा होणार असून प्रवास अधिक सुलभ व वेळेची बचत होणार आहे. सदर भुयारी मार्गाचे काम व्हावे, यासाठी बहुजन संघर्ष सेनेचे राजाभाऊ कदम, माजी सरपंच संदीप मारकड-पाटील यांनी ही मागणी खा.धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार नारायण पाटील, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचेकडे केली होती. याबाबत खा.मोहिते-पाटील यांनी रेल्वेमंत्री यांचेकडे सातत्याने पाठपुरावा केला.


## प्लॉट विकणे आहे

निलज रोड, यशोदिप मंगल कार्यालय मागील बाजूस व सदाशिव पार्क जवळ असलेला १७५० स्क्वे.फुट एन.ए. प्लॉट योग्य किंमतीत विकणे आहे

**संपर्क : मो.नं.8087555982**




## मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस

व

## सर्व सेवा केंद्र

## मस्कर ट्रेडिंग कंपनी

आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड

धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर, प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.

**बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.**

प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558



# जाहीर निविदा

मौजे पोंधवडी, ता.करमाळा या ग्रामपंचायतीच्या १५ वा वित्त आयोग निधी (ग्रा.पं.स्तर) मधील कामाच्या खालीलप्रमाणे निविदा खुल्या गटातून व नोंदणीकृत मजूर संस्था अथवा सुशिक्षित बेरोजगार अथवा ठेकेदार यांचेकडून मागविण्यात येत आहेत. तरी ही जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांक पासून सात दिवसात दोन लिफाफा पध्दतीने बंद लिफाफ्या मधून ग्रामपंचायतीस पाठवाव्यात. वेळेत न आलेल्या निविदाचा विचार केला जाणार नाही.

| क्र. | कामाचे नाव व ठिकाण | अंदाजपत्रकीय रक्कम | तांत्रिक मान्यता क्रमांक | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा विस्तारीकरण करणे | ७०,०००/- | ४७२/२०२४-२५ | |
| २ | पाणीपुरवठा विस्तारीकरण करणे | ५३,३६४/- | ४७१/२०२४-२५ | |
| ३ | पाणीपुरवठा विस्तारीकरण करणे | २,६८,६६८/- | ४७५/२०२४-२५ | |
| ४ | पाणी पुरवठा विस्तारीकरण करणे | ७०,०००/- | ४७३/२०२४-२५ | |
| ५ | पाणी पुरवठा विस्तारीकरण करणे | ८०,०००/- | ४७४/२०२४-२५ | |
| ६ | पाणी पुरवठा विस्तारीकरण करणे | ३,००,०००/- | ४७६/२०२४-२५ | |

**नियम व अटी...**

१) सर्व कामाची अंदाजपत्रके व स्थळे ग्रा.पं. मध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) निविदा फि रू.२००/- असेल.
३) बयाणा रक्कम १%, सुरक्षा ठेव २% व कामगार विमा १% काम सुरू करण्यापूर्वी भरावी लागेल.
४) सर्व कामांचा कालावधी दोन महिन्याचा राहील. कलावधीत काम पूर्ण करावे लागेल.
५) काम पूर्ण झाल्यानंतर बिलामधून उपकर (सेस) १% रॉयल्टी M.B. प्रमाणे व G.S.T.१८% कपात केली जाईल.
६) कमीत कमी तीन निविदा आल्यानंतर किमान दराची निविदा मंजूर करणेत येईल.
७) निविदेत बदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीस राहील.(ग्रामपंचायत ठरावाने)
८) अंदाजपत्रकाची प्रत ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे.

# टेंभूर्णी बनावट नोटा प्रकरण : करमाळा तालुक्यातील मास्टरमाईंडने रचला प्लॅन

करमाळा(सं.प्र.) : टेंभूर्णी येथील एकास ६४ लाख रूपयांच्या बनावट नोटा व ते बनवण्यासाठी लागणारे तीन लाखाचे साहित्य राहुरी आणि टेंभूर्णी पोलीसांनी जप्त केले आहे. या प्रकरणात त्यांचे दोन साथीदारांनाही अटक केली. यावेळी अर्जुननगर (ता.करमाळा) येथील पप्पू उर्फ प्रतिक भारत पवार (वय-३३) त्यांच्या हाती लागला आहे. पप्पू यास यापूर्वीही बनावट नोटा खपवताना कुर्डूवाडी पोलीसांनी सन २०२२ मध्ये बेड्या ठोकल्या होत्या. मागील आठ महिन्यापूर्वी २२ महिन्यानंतर त्याची जामीनावर सुटका झाली होती. कंदर मध्ये नोकर भरतीसह विविध प्रकारचे ऑनलाइन अर्ज भरताना प्रिंटरमधून ५०० रूपयांच्या नोटेसारखी हुबेहूब कलर प्रिंट येत असल्याचे पाहून पप्पुला ही कल्पना सुचली. आरोपी पप्पू उर्फ प्रतिक पवार याने टेंभूर्णी येथील शीतलनगर मधील समाधान गुरव यांचेकडे एमआयडीसीत एका कंपनीत कामाला आहे, असे सांगून भाड्याने खोली घेतली. त्यात छपाई मशीन, संगणक, प्रिंटर, स्कॅनर, कटिंग मशी, शाई, कागदाचे बंडल आणून बनावट नोटा छपाई सुरू केले. यातूनच बनावट नोटा छापून त्या चलनात आणून पैसा कमावणे सुरू झाले. पुन्हा नव्याने पप्पू पवार याने राजेंद्र कोंडिबा चौघुले (रा.पाटेगाव, ता.कर्जत), तात्या विश्वनाथ हजारे (रा.पाटेगाव) यांना बरोबर घेऊन तो या बनावट नोटा दुचाकीवरून दोन साथीदारांना घेऊन राहुरी येथे बनावट नोटा चलनात आणण्यासाठी व दोन लाखाच्या बनावट नोटा देण्यासाठी एक लाख रूपयाची रक्कम घेणार असल्याची माहिती राहुरी पोलीसांना मिळाल्याने त्यांनी सापळा रचून तिघा आरोपींना रविवारी अटक केले आहे.



## गीर गाईचे गावरान तुप मिळेल.

मो.9822058106



## विघ्नहर्ता इंटिरीयर

प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051

करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम

## देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर

• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन प्लोरिंग • सनमायका



प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252

पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

ONSPOT ENERGY
एनर्जी ऑन द स्पॉट..!
9 तास एलईडी बल्ब
2 वेळा लॅपटॉप चार्ज
12 तास कॅमेरा चार्ज
12 तास राऊटर चार्ज
5 वेळा मोबाईल चार्ज
Micro
1 वर्ष वॉरंटी
वजन 700 ग्रॅम | शॉर्ट सर्किट प्रोटेक्शन | चार्जिंग वेळ 4 तास
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
सोलर | इन्व्हर्टर | बॅटरी 9172927337
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड, करमाळा

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
चिवटे उपहारगृह

| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सँडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>मैसुरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी
साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.९००६९४३००६
कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

# चमत्कारांच्या पडद्याआडचं सत्य - निंभोरे येथील प्रबोधनात्मक कार्यक्रमात खुलासे



करमाळा (सं.प्र.) : शनीशिवपूर (पोथरे) ते पंढरपूर या पायी दिंडी सोहळ्यात निंभोरे येथे अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या कार्यकर्त्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधून चमत्कारातील विज्ञान उलगडण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमात अहिल्यानगरचे जिल्हा सचिव व्ही.आर.गायकवाड, सोलापूर जिल्हा सचिव अनिल माने, करमाळा अंनिसचे मार्गदर्शक प्राचार्य नागेश माने यांनी विविध चमत्कारीक वाटणाऱ्या कृतींचे प्रात्यक्षिकांसह शास्त्रीय विवेचन करून उपस्थितांना अंधश्रध्देपासून दूर राहण्याचे आणि वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकारण्याचे महत्व पटवून दिले. चमत्कार म्हणजे केवळ भ्रम असून, त्यामागे वैज्ञानिक तत्वे असतात हे दाखविण्यासाठी प्रात्यक्षिकांचा उपयोग करण्यात आला.

यावेळी वारकऱ्यांशी संवाद साधताना व्ही.आर.गायकवाड म्हणाले, की इतरांकडून आदराची अपेक्षा करण्यापेक्षा आपणच इतरांची कदर केली की जगणं खूप आनंदी होऊन जाते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रवींद्र वळेकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प.ॲड.बाबूराव हिरडे, अंनिसचे तालुका कार्याध्यक्ष दिगंबर साळुंके, संजय हांडे, नवनाथ चौधरी, ज्येष्ठ कवी प्रकाश लावंड, हरिभाऊ झिंजाडे, राजेंद्र परदेशी उपस्थित होते. नानासाहेब पठाडे यांनी सुत्रसंचालन केले.

# डॉक्टर्स डे निमित्त करमाळ्यातील डॉक्टरांचे मॅरेथॉन



करमाळा(सं.प्र.) : डॉक्टर डे चे औचित्य साधून पेशंटच्या आरोग्याची नेहमी काळजी घेणारे डॉक्टरांनी स्वत:च्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी डॉक्टर्स मॅरेथॉनचे आयोजन केले होते. श्रेया वेलनेस सेंटरचे गणेश तळेकर व श्रेया तळेकर यांनी सर्व डॉक्टरांचा बीएमआय तपासून फिटनेसच्या टिप्स दिल्या. यावेळी डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष डॉ.उमेश जाधव, उपाध्यक्ष डॉ.मनोज काळे, माजी नगरसेवक डॉ.अविनाश घोलप, डॉ.राजेश शहा, डॉ.संदेश शहा, डॉ.प्रमोद कांबळे, डॉ.विशाल शेटे, डॉ.अनुप खोसे, डॉ.प्रमोद शिंदे, डॉ.पोपट नेटके, डॉ.रविकिरण पवार, डॉ.लोकरे, डॉ.सारंगकर, डॉ.विनोद गादीया, डॉ.माही भोसले, डॉ.बिपीन परदेशी, डॉ.तुषार गायकवाड, डॉ.निंबाळकर, डॉ.महेश दुधे, डॉ.सुहास कुलकर्णी, डॉ.वैशाली घोलप, डॉ.मंजिरी नेटके, डॉ.कविता कांबळे, डॉ.विजया गायकवाड, डॉ.उर्मिला जाधव, डॉ.मेघना निंबाळकर, डॉ.वैशाली खोसे, डॉ.वैष्णवी पाटील यांचेसह शहरातील इतर डॉक्टर उपस्थित होते.

# केमचे प्रलंबित ३३ केव्ही लाईनचे काम पूर्ण करण्याचे खा.मोहिते-पाटलांचे अधिकाऱ्यांना आदेश



करमाळा(सं.प्र.) : केम गावातील दीर्घकाळ प्रलंबित असलेला वीजेचा प्रश्न अखेर मार्गी लावण्याच्या दृष्टीने खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी या संदर्भात स्वत: पुढाकार घेत अकलुज येथे झालेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत केमसाठी स्वतंत्र ३३ केव्ही लाईनच्या कामास तातडीने गती देण्याचे स्पष्ट आदेश संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना दिले.

मागील नऊ वर्षापासून येथील कुंकू कारखानदारांनी पाठपुरावा करून केम बे साठी जेऊर येथील २२० केव्ही सबस्टेशन मधून स्वतंत्र ३३ केव्ही ची आठ किमी लाईन मंजूर करवून घेतली आहे. सदरील लाईनचे टेंडर देखील दोन वर्षापूर्वी पार पडले आहे. यानंतर अनेकवेळा पाठपुरावा करून सुध्दा प्रत्यक्ष काम सुरू न झाल्याने २४ जूनला केम ग्रामस्थांनी गावची बाजारपेठ बंद ठेवून जेऊर वीज वितरण कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आमरण उपोषण केले होते. याची दखल घेत खासदार मोहिते-पाटील यांनी माढा लोकसभा मतदार संघातील महत्वाच्या समस्या सोडवण्यासाठी अकलुज येथे अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक पार पडली. या बैठकीत केम गावासाठी स्वतंत्र ३३ केव्ही विद्युत वाहिनी व बे-ब्रेकर संदर्भात चर्चा झाली. महावितरणचे अधिक्षक अभियंता माने (सोलापूर) व इन्फ्रास्ट्रक्चरचे मुख्य अभियंता (बारामती) यांच्याशी खा.मोहिते-पाटील यांनी थेट संवाद साधला. केमसाठी स्वतंत्र ३३ केव्ही लाईनसाठी त्वरीत काम पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. त्यावर माने यांनी काम लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. तसेच वडशिवणे तलावात उजनीच्या ओव्हरफ्लो पाण्याचे नियोजनबध्द वितरण करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. यावेळी सरपंच राहुल कोरे, सचिव मनोज सोलापूरे, कुटूंब उद्योगपती धनंजय सोलापूरे, गोरख खानट, अरविंद वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.

CBSE CBSE CBSE
विधाते क्लासेस
Science & Technology
Foundation Course
फक्त इ.५ वी साठी (सेमी) तयारी येणाऱ्या (२०२६) CBSE ची
पुढील वर्षी स्टेट बोर्ड शैक्षणिक अभ्यासक्रम CBSE या पॅटर्नप्रमाणे असणार आहे. याचा विचार करून विधाते क्लासेस च्या वतीने विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सोपा जावा; याकरीता खालील कोर्सेस आम्ही सुरू करीत आहेत.
• Reading Skill
• Science Vocabulary करून घेतली जाईल.
• परिसर अभ्यास Test Series (इ.५ वी)
• विद्यार्थ्यांच्या प्रगतीची हमी
• प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष
• नवीन बॅच १ जुलै पासून सुरू
• प्रवेश मर्यादित
तरी आपला प्रवेश आजच निश्चित करा...!
प्रवेश सुरू..!
संपर्क/पत्ता : किल्लावेस, करमाळा. (9404880723 / 7588020790)



साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

# विविध व्यवसायानंतर शाश्वत शेतीसाठी सेंद्रिय खताचा नवा व्यवसाय
## विजयराव पवार यांचा बदललेला मार्ग

करमाळा : जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर विविध प्रयोग व विविध व्यवसाय करणे जवळपास अशक्य असते. पण काही धाडसी लोक असे धाडस करतात आणि प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होत नवा अनुभव घेतात. असे लोक दुर्मिळ असतात, अशा दुर्मिळ व्यक्तीमत्वात विजयराव पवार यांचे नाव आहे. हे नाव केवळ करमाळ्यातच नव्हेतर संपूर्ण तालुक्यात सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रात आपला ठसा उमटविणारे व्यक्तीमत्व आहे.

सैन्यातील सुभेदार मेजर कै.धोंडीराम पवार यांचे ते सुपुत्र. शिक्षणाची पायाभरणी करमाळ्यातच झाली. बी.कॉम नंतर पुणे येथून एम.कॉम पूर्ण केले. त्यांनी नोकरीच्या नादी न लागता व्यवसायात उडी घेतली. सन १९९० मध्ये व्यवसाय क्षेत्रात त्यांनी पहिले पाऊल टाकले. त्यावेळी त्यांनी 'विजय ऑटोमोबाईल' नावाने दुकान सुरू केले. या व्यवसायात जम बसल्यानंतर जेसीबी, पोकलेन मशिनरी खरेदी करून जोरदार व्यवसाय केला. त्यानंतर बजाज टू व्हीलर व टाटा मोटर्सची सबडीलरशीप घेतली. त्यानंतर 'प्रगती टायर्स' या नावाने जे.के. टायर्स कंपनीची एजन्सी घेऊन या व्यवसायातही उज्वल यश संपादन केले. दरम्यान केवळ व्यवसायपुरते मर्यादित न रहाता त्यांनी वडिलोपार्जित शेतीला आधुनिकतेची जोड देऊन ती सिंचनाखाली आणली आणि स्वत: जातीने ती फुलवली. त्यानंतर त्यांनी शिक्षण क्षेत्रात पाऊल टाकत बीसीए, बीबीए,



बी.एस्सी चे 'रणजितसिंह मोहिते-पाटील' या नावाने महाविद्यालय सुरू केले. प्रचंड स्पर्धा व शासकीय अनुदानाचा अभाव यामुळे हे महाविद्यालय त्यांना तीन वर्षात बंद करावे लागले.

याबरोबरच त्यांनी सामाजिक कार्याची नाळ जोडली. श्री.पवार यांनी दिगंबरराव बागल कला-क्रिडा मंडळ स्थापन केले. त्याद्वारे त्यांनी विविध उपक्रम राबवले. राजकारणात माजी मंत्री कै.दिगंबरराव बागल, आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, विलासराव घुमरे यांच्या माध्यमातून अनेक गरजूंना यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व मकाई साखर कारखान्यात जॉब मिळवून दिला. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष, महाबीजचे संचालक अशा अनेक जबाबदारीच्या पदांवर त्यांनी आपली कारकिर्द घडवली. राज्याचे तत्कालीन कृषी मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे ते जवळचे नातेवाईक असून त्यांच्या माध्यमातून पवार यांची 'महाबीज'वर संचालक म्हणून निवड झाली होती

आणखीन एक विशेष म्हणजे त्यांना दोन्ही मुलीच आहेत. श्री.पवार व सौ.वंदना पवार यांनी मुलाचा अट्टाहास न करता आपल्या दोन्ही कन्यांना अभियंता बनवले आहे. मोठी कन्या रेशम पुणे येथे 'सायबेज' कंपनीत उच्च पदावर जॉब करत आहे व जावई ॲड.रोहन चोपडे पुणे येथे वकिली व्यवसाय करत आहेत. छोटी कन्या प्रगती एम.एस शिक्षणासाठी अमेरिकेतील टॉप पाच विद्यापीठातील एका विद्यापीठात शिक्षण घेत आहे. आता मात्र त्यांची नजर शाश्वत शेतीकडे वळली आहे. सेंद्रिय शेती म्हणजे आजच्या काळाची गरज. आरोग्यदायी अन्न, निसर्गाशी सुसंवाद साधणारा शेतीचा मार्ग. ही गरज ओळखून विजयराव पवार यांनी सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या **राघवेंद्र फर्टिलायझर प्रा.लि; कोल्हापूर** यांचे **वृंदावन भट्टी स्पेशल** या सेंद्रिय खताच्या विक्रीचा नवा व्यवसाय 'श्री स्वामी समर्थ' या नावाने गुरूवार दि.१० जुलै पासून सुरू होत आहे. हे केवळ खतांचे दुकान नाही तर पर्यावरणानेही शेतकरी हिताचे एक केंद्र होत आहे. प्रदूषणमुक्त, आरोग्यपूर्ण अन्ननिर्मितीचा मुलमंत्र यातून मांडला जात आहे. आज शेतकऱ्यांना हवी असते पारदर्शकता, विश्वास, अनुभवाचा आधार. विजयराव पवार यांचा अनुभव, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी ही या नव्या प्रवासाची खरी ताकद आहे. करमाळा व परिसरातील शेतकऱ्यांसाठी हे दुकान सेंद्रिय शेतीकडे नेणारी.. नवसंजीवनी ठरणार आहे !

# विठू माझा...



सावळा पांडुरंग कीर्तनात दंगला
वारकऱ्यांच्या हाकेला जागोजागी पावला ।
नाही त्याला नैवेद्याची ना नवसाची हाव,
भाळतो हरी गजरात आणि
मनी ठेवा शुध्द भाव ॥
शिव्या खाऊनी जनीच्या..
विठू गालात हसला,
पदोपदी जनीच्या संकटात..
माऊली बनुन धावला ।
सावळ्या विठुला भेटण्यास..
कासावीस सावता,
काही केल्या सावताला सवड होईना ॥
सावताचे पाहुनी वेड भेटीचे,
धावले अरणगावाला राजा पंढरीचे ।
नाम देवाच्या भक्तीला विठु माझा भारावला,
नाव दिले पायरीला..,
मान पहिला नामदेवाला ॥
चंद्रभागेतीरी मांडुनी भक्तीचा मळा,
गळाभेट माऊलीची पाहीन सोहळा ।
वेध लागल आम्हा आषाढी वारीचे,
वारकऱ्यांमध्ये मी शोधीन रूप विठुरायाचे ॥

**...प्रणिता काटुळे, करमाळा.**


# सून सायबा सून...!

आजकाल मुला-मुलींची लग्न करणे हा एक मोठा जुगार ठरतोय. मुलाला चांगली पत्नी म्हणजे दिसायला चांगली नव्हे आणि मुलीला चांगला वर मिळणे, हा नशिबाचा भाग आहे; असे म्हणायला आता भरपूर वाव आहे. रोजच्या बातम्या पाहिल्या तर नवरा-बायकोतील भांडण, बेबनाव, लफडी, भानगडी याला नुसता ऊत आलेला दिसून येतो.

मुळातच मुलं-मुली शिकल्या, खुल्या विचारांच्या बनल्या. या खुलेपणात लग्न झाल्यावर एकमेकांशी असणारी कमिटमेंट ही पिढी विसरायला लागली की काय ? याची शंका यावी इतकं आजच वैवाहिक आणि नैतिक वातावरण गढूळ आहे. इथे मी काही मॉरल पोलिसिंग करीत नाही.., खरंतर खुले विचार याचा चुकीचा अर्थ समाजात रूढ होत आहे. खुला विचार म्हणजे स्वैराचार नव्हे हे सांगूनही आजच्या समाजाला पटत नाही याला काय म्हणावे ? लग्नाळू मुलांसाठी मुली मिळत नाहीत आणि मिळाल्या तर त्यांचे नखरे जास्त असतात. म्हणजे पुणे येथेच स्थायिक हवा आणि त्याला स्वत:चे घर असावे. तसेच पुन्हा वरून विचारतात की, आपले लग्न झाल्यावर तुझे आई-वडील कुठे राहणार ? म्हणजे यांचे शिक्षण कमी असो जास्त असो नोकरी असो यांना पुणे पाहिजे आणि त्यात सासू-सासरे नकोत..! या गोष्टी खूप विचलित करणाऱ्या आहेत. लग्नाच्या अगोदर पुण्यात राहू; असे मुलगा बोलला पण लॉकडाऊन मध्ये पुणे येथील धंदा बंद पडला व तो गावाकडे राहून व्यवसाय करू लागला; हे मुलीला आवडले नाही. पुण्यात राहू असे लग्नाअगोदर म्हणूनही तू गावाकडे राहतोस.. या कारणावरून त्या मुलीने घटस्फोट घेतला हे उदाहरण माझ्या समोर आहे.

ज्यांना चांगल्या सुना मिळाल्यात ती माणसे भाग्यवान आहेत. नाहीतर २० मिनीटांच्या अंतरावर असूनही सून आम्हाला भेटत नाही, आम्ही भेटलो तर नीट बोलत नाही; असे अतिशय खिन्नपणे सांगणारे ज्येष्ठ नागरीक माझ्या पाहण्यात आहे. (ही संख्या मोठी आहे) एका बाजुला बायको आणि दुसऱ्या बाजूला आई-बाप या मानसिक कुचंबनेत मुलगा भरडला जातो. मनात इच्छा असूनही त्याला आई-वडिलांसोबत राहता येत नाही किंवा त्यांना भेटता येत नाही. त्याच्या त्या मानसिक वेदनामुळे, आगतिकतेमुळे तो स्वत:ला कामात अखंड बुडवून घेतो. त्याच्या कोंडमाऱ्याला आउटलेट मिळत नाही. त्याचाच परिणाम म्हणून त्यांच्या नात्यात हळूहळू दुरावा निर्माण होतो. त्याचीच परिणीती नंतर एक्स्ट्रा मेरिटल अफेअर मध्ये किंवा नशेत होते आणि साऱ्यांचे तीन तेरा होऊन जातात.

मुलींच्या बाबतीतही तिला समंजस, केअरिंग जोडीदार मिळेल का ? याची चिंता बापाला असते. तिचे सासर हावरट नसावे. तिथे ती



माहेरासारखी रहावी.. ही पित्याची माफत अपेक्षा असते. पण होतंय काय.. की आजकालची उच्च शिक्षित मुले ही बहुदा नशेडी असतात. त्या गोष्टी त्यांच्यात कॉमन आहेत नव्हे त्या त्यांच्या संस्कृतीच्या अविभाज्य घटक आहेत. त्याचबरोबर त्यांचे बाहेरच्या विवाहित स्त्रियांशी असणारे संबंध ही एक मोठी सामाजिक समस्या आहे. यावर मी फार काही भाष्ट करणार नाही; पण या गोष्टी सत्य आहेत. तरीही अशा ठिकाणी मुलगी गेली तर त्या बाळाने मागच्या साऱ्या गोष्टी विसरून व्यवस्थित त्या मुलीशी संसार करावा आणि तिचाही काही पास्ट असेलतर त्याचीही कुठे वाच्चता न करता तिनेही संसार जमेल तसा ओढावा ही अपेशा करणे गैर नाही. पण या गोष्टी फारशा घडताना दिसून येत नाहीत हे आपल दुर्दैव आहे. त्यामुळे आत्ताच्या जमान्यात भौतिक सुविधा खूप साऱ्या आहेत. गाडी, बंगला, पैसा भरपूर असूनही ही मंडळी आतून पूर्णपणे उध्वस्त झालेली असतात. खाजगी डिटेक्टिव्ह हायर करून आफ्टर गॅरेज आणि बिफोर गॅरेज इन्वेस्टीगेशन करण्याचा फंडा समाजात वाढतोय.

सध्या मेघालयचे हनिमून कपल मधील नवरदेवाचा मर्डर हे प्रकरण बघता बिफोर मॅरेज इन्वेस्टीगेशन करायलाच हवे असे ठामपणे म्हणणारा एक वर्ग आता वाढेल आणि आफ्टर मॅरेज इन्वेस्टीगेशन करण्याची पाळी येत असेलतर त्यासारखी दु:खद बाब दुसरी नाही. एकूणच भविष्यात आर्ष काळासारखे खुले लैंगिक संबंध समाजात निर्माण झाले तर त्यात आश्चर्य वाटू नये.

अशा नीतीमुल्याबाबत बोलताना एकदा बरेच शिक्षक मित्र बैठकीत म्हणाले, की ही परिस्थिती शिक्षकच बदलू शकतो. तेव्हा त्याचवेळी तिथे उपस्थित असणारे प्रगतशील शेतकरी व आमचे एक मित्र लगेच म्हणाले.., 'गप्प बसा भडव्यांनो.. सगळ्यात जास्त लफडी तर तुमच्या शिक्षकांतच आहेत !' त्याच्या त्या बोलण्यानंतर काही काळ तिथे शांतता पसरली, नंतर आपलेच लफडे याने पकडले की काय.. असे वाटून हळूहळू एक-एक शिक्षक मित्र तिथून गुपचूप सटकला.

सांगण्याचा हेतू एकच.. घरात सुनबाई आणताना आपण कोणती डोकेदुखी घरात आणतोय हे कळायला मार्ग नाही. त्याचबरोबर जावई त्याच्या आई-वडिलांसोबत मुलीला सुखाने सांभाळेल का ? याचेही टेन्शन आहे. पण एक आहे.. मुलीच्या आई-वडिलांना मुलाचे आई-वडिल चालतील का ? हाही मोठा प्रश्न आहे !

**...भीष्माचार्य चांदणे, करमाळा.**
**(मो.९८८११७४९८८)**






करमाळा तालुक्यातील सर्वोत्तम विक्रेता म्हणून अल्ट्राटेक सिमेंट कंपनी तर्फे दिला जाणारा पुरस्कार **शिवम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स** या फर्मचे मालक **श्री.अमोल ढवळे** यांना मिळाल्याबद्दल..

## हार्दिक अभिनंदन !


पुरस्काराचे स्वरूप ५० ग्रॅम सोने

**शुभेच्छुक**

तानाजी ढवळे, मंगेश(बबलू) ओहोळ, संपत सरवदे
सुखदेव कोपनर, महंमद पठाण, सागर वायकर
बाळासाहेब टकले, रफीक पठाण. नागनाथ चौधरी, विनोद चव्हाण


**शिवम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स** बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ शेजारी, करमाळा.

---



भव्य शुभारंभ..! करमाळा शहरामध्ये प्रथमच भव्य शुभारंभ..!!

**राघवेंद्र फर्टिलायझर्स प्रा.लि., कोल्हापूर** यांचे सेंद्रिय खताचे



# श्री स्वामी समर्थ ॲग्रो

गुरूवार १० जुलै २०२५ रोजी सकाळी ११.०० वा.




या दुकानाचा

## ।। भव्य उद्घाटन सोहळा ।।

**शुभहस्ते : मा.श्री.एस.के.भोसले** (जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी सोलापूर)

**प्रमुख पाहुणे**

**मा.शिल्पाताई ठोकडे** तहसीलदार, करमाळा.
**मा.डॉ.अमित कदम** गटविकास अधिकारी
**मा.विलासराव घुमरे (सर)** सचिव, विद्या विकास मंडळ
**मा.देवराव चव्हाण** तालुका कृषी अधिकारी करमाळा
**मा.डॉ.ॲड.बाबूराव हिरडे** अध्यक्ष, ग्रामसुधार समिती
**मा.गणेश माने-देशमुख** चेअरमन, जयहिंद शुगर आचेगाव
**मा.नरेंद्र पंडितराव** राघवेंद्र फर्टिलायझर्स प्रा.लि;

**सन्माननीय उपस्थिती**

**मा.संजय ताटे-देशमुख** चेअरमन, धनस्मृती टेक्साईल
**मा.दिनेश भांडवलकर** चेअरमन, मकाई कारखाना
**मा.सुधाकर(काका) लावंड** ता.प्रमुख, शिवसेना(उबाठा)
**मा.सुजित बागल** प्रगतशील बागायतदार
**मा.महेश सुर्यपुजारी** प्रगतशील बागायतदार
**मा.सुहासराव माने** उद्योजक, सोलापूर
**मा.संजय पाटील भिमानगरकर** मा.सभापती, जि.प.सोलापूर
**मा.उध्दवराव सरडे** उद्योजक, करमाळा
**मा.संजय सावंत** मा.नगरसेवक, क.न.प.
**मा.ॲड.अजित विघ्ने** प्रवक्ते, राष्ट्रवादी काँग्रेस
**मा.विनायक रासकर** प्रगतशील बागायतदार
**मा.विठ्ठल(आप्पा) सावंत** प्रगतशील बागायतदार
**मा.आप्पासो पाटील वडकबाळकर** मा.संचालक, कृ.उ.बा.स.सोलापूर
**मा.चिंतामणी जगताप** मा.उपसभापती, कृ.उ.बा.समिती
**मा.संभाजीराव फाळके** प्रगतशील बागायतदार
**मा.अशोक निंबाळकर** प्रगतशील बागायतदार
**मा.संतोष पाटील** मा.चेअरमन, आदिनाथ कारखाना
**मा.महेंद्र पाटील** व्हा.चेअरमन, आदिनाथ स.सा.कारखाना
**मा.विवेकराव येवले** मा.संचालक, मकाई स.सा.कारखाना
**मा.ललित आगरवाल** मा.शहराध्यक्ष, भाजपा
**मा.दत्तात्रय आडसुळ** मा.उपसभापती, कृ.उ.बा.समिती
**मा.राजेंद्रसिंह राजेभोसले** मा.संचालक, जिल्हा दूध संघ
**मा.राजेंद्र बारकुंड** मा.उपाध्यक्ष, जि.प.सोलापूर
**मा.दिपक(आबा) देशमुख** चेअरमन, लोकविकास दूध डेअरी
**मा.बाबूराव नेटके** मा.कृषी अधिकारी, करमाळा
**मा.सोपानकाका शिंदे** प्रगतशील बागायतदार, पोथरे
**मा.अतुल पाटील** मा.सभापती, पं.स.करमाळा
**मा.हिम्मतराव शिंदे** उद्योजक, जातेगाव
**मा.महेश चिवटे** जिल्हा प्रमुख, शिवसेना
**मा.निळकंठ अभंग** मा.कृषी अधिकारी, करमाळा
**मा.नवनाथ बागल** प्रगतशील बागायतदार
**मा.ॲड.रोहन चोपडे** पुणे

तरी या उद्घाटन समारंभास शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे; ही नम्र विनंती !

• स्थळ : मारूती मंदिराजवळ सावंतगल्ली, करमाळा., जि.सोलापूर (मो.7350653555, 9423587477)

आपले नम्र

**मा.श्री.विजयराव पवार**
माजी शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस करमाळा
माजी संचालक, महाबीज महामंडळ
माजी जिल्हा उपाध्यक्ष, काँग्रेस(आय) सोलापूर

राघवेंद्र फर्टिलायझर्स प्रा.लि., कोल्हापूर यांचे सेंद्रिय खताचे
**• अधिकृत डिस्ट्रीब्युटर •**